**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **अन्नधान्य उत्पादनात भारताला आत्मनिर्भर करणं तसंच जागतिक बाजारासाठी उत्पादन करणं आपलं उद्दिष्ट असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना नागपूर विद्यापीठाची 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' करीत आदरांजली, विद्यापीठ गीत गायन करीत केले ४ विश्वविक्रम.**
3. **प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराजांचे ज्ञानसाहित्य जतन व्हावे - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सूचना.**
4. **जमीन मोजणीचा निपटारा आता ३० दिवसांत होणार - महसूल विभागाचा महत्वपूर्ण निर्णय.**

---

पीएम धनधान्य कृषी योजना

अन्नधान्य उत्पादनात भारताला आत्मनिर्भर करणं तसंच जागतिक बाजारासाठी उत्पादन करणं हे आपलं उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेसह ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी योजनांचा प्रारंभ आज पंतप्रधानाच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. पंतप्रधानांनी यावेळी कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातल्या ५ हजार ४५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचंही उद्घाटन केलं. शेतकरी कल्याण, कृषी स्वावलंबन आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा बळकट करणं हे या योजनांचं उद्दिष्ट आहे. देशात आज डाळीची आयात करावी लागते, त्यामुळे डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता प्राप्त करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात येणार असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. देशातल्या ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर डाळीचं उत्पादन करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे. पिकांची उत्पादकता वाढवणं, पीक उत्पादनाची शाश्वतता निश्चित करणं, तसंच काढणी पश्चात तंत्रज्ञान आणिपतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशानं देशातल्या 100 जिल्ह्यांची निवड केंद्र सरकारनं या योजनेसाठी केली आहे. त्यात

राज्यातल्या पालघर,रायगड, धुळे, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर,गडचिरोली या नऊ जिल्ह्यांची निवड झाली आहे.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी 23 सेकंद)***

***सौ से ज्यादा पिछड़े जिलों में जिसे हम अब एस्पिरेशनल डिसीज कहते हैं, अब हम उसको पिछड़े जिले नहीं कहते बीस प्रतिशत  बस्तियां ऐसी थीं, जिन्होंने आजादी के बाद से सड़क हीं नहीं देखी थी। आज आकांक्षी जिला योजना की वजह से अब ऐसी ज्यादातर बस्तियों को भीसड़कों से जोड़ा जा चुका है।***

प्रशासनाने शेतकऱ्यांसोबत मिळून धनधान्य योजनेची अंमलबजावणी करावी असं आवाहन त्यांनी केलं. या योजनेचा राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम पुण्यात कृषिमंत्री दत्तात्रयभरणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

---------------------------------------

विद्यापीठ गीत

'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे...' या विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन करून 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' करीत वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना विद्यापीठाने आदरांजली अर्पण केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, क्रीडा आणि  शारीरिक शिक्षण विभाग आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाजवळील मैदानावर विश्वविक्रमी कार्यक्रम आज  सकाळी पार पडला. यावेळी विद्यापीठाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसह एकूण चार विश्वविक्रमाची ऐतिहासिक नोंद केली. या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मार्गदर्शन करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार आजही समर्पक असून त्यांच्या मानवता धर्माचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी 8 सेकंद)***

***आज पूर्ण विश्व संघर्षाच्या पार्श्वभूमीवर उभा आहे त्यावेळी तुकडोजी महाराजांनी दिलेला हा मानवतेचा संदेश हा विश्वा करता उपयोगाचा आहे.***

कार्यक्रमाला हास्य अभिनेता भारत गणेशपुरे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, आमदार डॉ.आशिष देशमुख, कार्यकारी कुलगुरू डॉ.माधवी खोडे चवरे उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी दिलेला करुणा, मानवता, बंधुभाव, एकात्मता, राष्ट्रप्रेम, तरुणांनी 'उद्योगी तरुण, वीर, शिलवान असावे' हा संदेश विद्यार्थ्यांसह समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा या उद्देशाने या आगळ्यावेगळ्या आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

--------------------------------------

राष्ट्रसंत पुण्यतिथी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७व्या पुण्यतिथीनिमित्त श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमात आज दुपारी ४ वाजून ५८ मिनिटांनी लाखो भाविकांनी साश्रूनयनांनी मौन श्रद्धांजली अर्पण केली. देशातील हा एकमेव शिस्तबद्ध मौन श्रद्धांजलीचा सोहळा असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची विशेष उपस्थिती होती.राज्याच्या विविध भागातून आलेल्या दिंड्या, पालख्यांच्या उपस्थितीत भाविकांनी 'श्रीगुरुदेव की जय' जयघोषात सहभाग घेतला. सर्व धर्मांच्या प्रार्थना, सामुदायिक ध्यान व भजनांच्या माध्यमातून मानवतेचा आणि समतेचा संदेश देणारा हा सोहळा भावपूर्ण वातावरणात पार पडला.

--------------------------------------

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानाबाबतची माहिती संकलित करण्यात येत आहे. त्याबाबतचे काम अंतिम टप्प्यात असून, निधीसाठीचा प्रस्ताव लवकरच केंद्र सरकारला पाठवण्यात येणार असून, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्य कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेत झालेल्या बैठकीनंतर भरणे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

--------------------------------------

स्वतंत्र खोली

राज्यातील सर्व क्रीडा संकुलं, स्पोर्ट्स क्लब, जिमखाना, तसंच स्थानिक क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी पोषाख बदलण्यासाठी स्वतंत्र खोलीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्याचे क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. दिग्गज माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी या संदर्भात केलेल्या आवाहनाला राज्य सरकारनं प्रतिसाद देत हा निर्णय घेतला आहे.

--------------------------------------

संत गुलाबराव महाराज

प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराजांचे साहित्य हे नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरणारं आहे, त्यामुळे त्यांच्या ज्ञानसंपदेचं तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं जतन करावं, असं आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. अमरावती जिल्ह्यातील माधान (ता. चांदूरबाजार) इथं समदृष्टी, क्षमताविकास आणि संशोधन मंडळ आणि श्री संत

गुलाबराव महाराज संस्थान तर्फे आयोजित दिव्यांग सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख, सक्षमचे अध्यक्ष विजयसिंह मोहता उपस्थित होते. बालपणापासून अंध असलेल्या संत गुलाबराव महाराजांनी 130 ग्रंथांमधून समाजाला ज्ञान, प्रेरणा आणि दिशा दिली. त्यांच्या साहित्य निर्मितीमुळे माधान ही प्रेरणादायी भूमी ठरली आहे असं गडकरी म्हणाले

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी १७ सेकंद)***

***जर असं ठरवलं, एखाद्या व्यक्तीचा अध्ययन करत असताना कितीही कठीण प्रश्न आणि समस्या असतील तरी त्यावर मात करून आपला विजय मिळवता येतो. आपण या दृष्टीने पूर्णपणे समाजाला मार्गदर्शन करू शकतो. हे उदाहरण संत गुलाबराव महाराजांनी आपल्या जीवनात सिद्ध करून दाखवलं.***

ज्ञानाचे जतन आणि प्रसार तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होणे गरजेचे असून, दृकश्राव्य माध्यमांचा वापर करून हे ज्ञान पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवावे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी गडकरी यांच्या हस्ते 'ज्ञानेशकन्या पुरस्कार' अमरावती इथल्या दृष्टीबाधित संघाला प्रदान करण्यात आला. तसेच दिव्यांग बांधवांना दृष्टीकाठी वाटप आणि 'सक्षम'च्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

---------------------------------------

जमीन मोजणी

नागरिकांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेत महसूल विभागाने जमीन मोजणीचा निपटारा ३० दिवसांत करण्याची नवी प्रणाली लागू केली आहे. राज्य सरकारने परवानाधारक खाजगी भूमापकांच्या नियुक्तीस मान्यता देत अधिसूचना जारी केली आहे.या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ३ कोटी १२ लाख प्रलंबित मोजणी प्रकरणांना गती मिळेल, असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. यापुढे पात्र खाजगी भूमापक अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोजणी करतील आणि अधिकारी त्याची तपासणी व प्रमाणिकरण करतील. यामुळे मोजणीतील अचूकता, पारदर्शकता आणि कायदेशीरता वाढेल."आधी मोजणी, मग खरेदीखत" या तत्त्वानुसार जमिनीचे व्यवहार व्हावेत, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

---------------------------------------

चौकांची पुनर्रचना

वाढत्या वाहतुकीला सुसंगत व्यवस्था निर्माण करण्यासाठी आणि पादचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नागपूर महानगरपालिका शहरातील ११ प्रमुख चौकांची

पुनर्रचना करत आहे. मनपा आयुक्त व प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी आज या कामांची पाहणी करून नोव्हेंबरपर्यंत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. व्हीसीए चौक, अशोका हॉटेल चौक, लिबर्टी टॉकीज चौक, लक्ष्मीभुवन चौक, माटे चौक, अलंकार टॉकीज चौक, विद्यापीठ लायब्ररी चौक, वंजारी नगर पाणीटाकी चौक, जाधव चौक आणि अग्याराम देवी चौक येथे हे काम सुरू आहे.

--------------------------------------

अंडा भुर्जी

महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू) अंतर्गत नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाच्या कुक्कुट पालन शास्त्र विभागातर्फे, भारतीय कुक्कुट विज्ञान संघटना (IPSA) आणि राष्ट्रीय अंडी समन्वय समिती (NECC) यांच्या सहकार्याने ५००१ अंड्यांची भुर्जी तयार करून जागतिक विक्रम स्थापण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. हा उपक्रम उद्या रविवार सकाळी ८ वाजता नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयात पार पडणार असून सेलिब्रिटी शेफ विष्णू मनोहर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केला आहे.

--------------------------------------